Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-3, Issue-9, Oct-2013 Available online at www.aygrt.isrj.net

# स्वामी विवेकानंदाचे वाङमयः- मानवी कल्याणाचे उर्जास्त्रोतः

रामदास प्र.इंगळे
रा.आ.महाविद्यालय वाशीम

**सारांश** १२ जानेवारी १८६३ मध्ये जन्मलेल्या स्वामी विवेकानंदाचा जन्म दिवस जगात 'युवक दिन' म्हणून साजरा केला जातो. विश्वनाथ आणि भुवनेश्वरी या दाम्पत्याच्या पोटी भारताच्या भूमीत जन्मलेले नरेंद्र श्री. रामकृष्ण परमहंसाच्या सानिध्यात आले आणि त्यांच्या जीवनाला दिशाच मिळाली. परमहंसनाही एक शक्तीमान शिष्य मिळाला. गुरूशिष्यांच्या हृदयातली मानवतावादी भावमुळे समाजात परिवर्तन घडवू लागली. हिंदुधर्मातील जातिभेदाचे निर्मुलन होण्यासाठी त्यांनी आपल्या भाषणातून वेळोवेळी विचार मांडले, अस्पृश्यता, उच्चनिचतेच्या मानसिकतेतून समाजाला मुक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

**प्रस्तावना :**

अखिल मानवाला स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी विश्वबंधुत्वाच्या भावाने भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवित स्वामी विवेकानंद जगभर भ्रमण करीत राहिले. भारतीयत्वात स्वत्व पाहणारे विवेकानंद तरूणाचे प्रेरणास्थान होते. ''तरूणाना संघटित करण्यासाठी व त्यांच्यातील शक्तीची ओळख करून देण्यासाठीच मी जन्माला आल्याचे ते सांगतात.'' ध्येयवेडा अवघ्या ३९ वर्षाच्या आयुष्यात त्यांनी विश्वातील मानवाला प्रचंड इच्छाशक्ती बरोबर आत्मिक शक्तीची जाणीव दिली. ४ जुलै १९०२ ला त्यांचा मृत्यु झाला असला तरी विचार कार्याने ते आजही तरूणांना प्रेरणा देत आहेत. म्हणून किती वर्ष जगला या पेक्षा तो कसा जगला. समाजाला तो काय देवून गेला हे महत्त्वाचे आहे. संत कवितेने म्हटल्या प्रमाणे

सुगंधे फिरत वही ।

विनयंध उड जावे ॥

सुगंधी तो जाती तरी ।

फिरत फकुन जावे ॥

विवेकानंदानी प्रत्येक तरूणात आत्मविश्वास निर्माण करणारे विचार मांडून अखिल मानव समाजाला शक्तीमान बनविले 'सो ऽ हं ऽ म' 'मी तो आहे' 'मी कोणीतरी आहे' असा शक्तीदायी भाव मानवी मनात निर्माण करण्याचे अलौकिक कार्य विवेकानंदानी केले. जीवनाला अर्थ प्राप्त करण्यासाठी दुर्बलता झटकून आत्मविश्वासाने जीवन ध्येय पूर्ण करण्यासाठी स्वामी विवेकानंदाचे विचार प्रेरणास्त्रोत आहे. या देशाला युवकाला आणि अखिल मानवाला उत्कर्ष करून घेण्यासाठी विवेकानंदाच्या विचाराची गरज आहे. 'उठा जागे व्हा ! तुमचे ध्येय प्राप्त होई पर्यंत थांबू नका, मला हे जमणार नाही मला ते जमणार नाही असे रडतराऊतासारखे म्हणू नका'' असा कडक शब्दात ते

झोपलेल्या तरूणांना जागे करतात. त्यांच्या आयुष्यातील 'वाकड्याची कथा' ''डोंगर मागील'' हे त्यांच्या आत्मशक्तीचा आवाज आत्मानुभूती शक्तीचा प्रेरणादायी परिपाक आहे. आत्मविश्वास ही जगण्याची शक्ती आहे. हा विश्वास आतून निर्माण होतो. प्रत्येक जीव हा शक्तीमान आहे, ज्ञानी आहे. असे विचार त्यांच्या भाषणात ओतप्रोत भरलेले दिसतात. विवेकानंद म्हणतात, ''जसा तुम्ही विचार कराल, तसेच तुम्ही व्हाल, जर तुम्ही स्वतःला दुबळे समजाल तर तुम्ही दुबळे व्हाल ! तुम्ही स्वतः तेजस्वी मानाल तर तेजस्वी व्हाल !'' मनाने दुबळी माणसे भाग्यपूर्वीच मरत

असतात. दुर्बलता हे दुःखाचे मूळ कारण आहे. प्रत्येक माणसाला ते असा आत्मनिर्भर होण्याचा सल्ला देतात. बल हे सुख असून तेच जीवनाची शक्ती आहे. एकदा अध्ययन केले नाही तरी चालेल पण तरुणांनी आपले शरीर फुटबॉलसारखे बनविले पाहिजे. असे त्यांना वाटत असे.

शिक्षणाबाबत स्वामी विवेकानंदांनी स्पष्ट विचार मांडले आहेत ''शिक्षण म्हणून असे काही वेगळे नसून मनुष्याच्या ठिकाणी आधीचे जे विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय.'' मुळात प्रत्येकजण ज्ञानी आहे. हे समर्पक उदाहरण देऊन त्यांनी सांगितले आहे. चकमकच्या की मध्ये चटकन सामावलेला असतो ! आग गारगोटीत असते, गारगोटी गारगोटीला घासली की आग बाहेर येते, त्याप्रमाणे प्रत्येक जीवाच्या अंतरी ज्ञान विद्यमान असून त्याचा मागोवा शोध लावतो. शिक्षण देणे म्हणजे ज्ञानावरचे अज्ञान अंधकाराचे आवरण दूर करणे होय. शिक्षणाचा मूळ उद्देश दृढ इच्छाशक्ती जागृत करणे. जिज्ञासा वाढविणे व प्रत्येक व्यक्तीला आत्मनिर्भर, स्वतंत्र व स्वावलंबी बनविणे आहे.

प्रत्येक व्यक्ती स्वतःच स्वतःचा गुरु असतो. बालक,रोपटे स्वाभाविक वाढत असते. आपण फक्त त्याला खतपाणी घालावे असते. बाहेरचा गुरु विद्यार्थ्यांना शिकवित नसून त्यांच्यातील बौद्धिक शक्तीला चालना देतो. त्यांच्यातील ज्ञानाला संक्रमित करण्यासाठी उद्दिपित करीत असतो. गुरुने पवित्र अंतःकरणाने हे कार्य केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्यातील शक्तीला जागृत करण्यासाठी ज्ञान लालसा, श्रद्धा, पवित्रता, नम्रता, आदर, नैतिकता, चारित्र्य हे गुण अंगी बाळगले पाहिजे.

स्वामी विवेकानंदांनी मनाच्या एकाग्रतेवर फार भर दिला आहे. मन जेव्हा एकाग्र व अंतर्मुख होऊन स्वतःवर केंद्रित होते तेव्हा आपल्यातील सर्व शक्ती आपल्या दास बनतात. गुरु रामकृष्ण परमहंस आजारी पडले तेव्हा रोगग्रस्त भागावर त्यांनी मन एकाग्र केले होते. शिक्षणाचा सार मनाची एकाग्रता आहे. आणि शिक्षणाचा खरा अर्थ इच्छा शक्तीचा विकास करुन माणूस घडविणे आहे.

राष्ट्रनिर्माणात शिक्षणाचे महत्वपूर्ण स्थान आहे. स्वामी विवेकानंदांनी एकसंघ भारताचे स्वप्न पाहिले होते. तरुण ही त्यांच्या कार्याची शक्ती होती. ते म्हणतात, ''मला माणसे हवी आहेत, तराठ,उत्साही, श्रद्धावान व निष्कपट अशी शंभर तरुण मिळाले तर मी सर्व जगात क्रांती घडविन !'' तरुण त्यांच्या विचार कार्याचा आधार असल्याने तरुणांना संघटित करण्यासाठीच मी जन्माला आल्याचे स्पष्ट करीत तरुणांना शक्तीमान होण्यासाठी लढण्याचा सल्ला देतात. ''माघार घेतल्याने तुमचे संकट टळणार नाही. रडून तुमच्या दुःखाचा अंत होणार नाही. जगून मरण्यापेक्षा झिजून झिजून झुंजत झुंजत लढत मरा.'' ''तुमच्या भाग्याचे तुम्हीच विधाते आहात, जे बल वा सहाय्य तुम्हाला हवे आहे ते तुमच्या स्वतःच्या आत आहे'' माणूस घडविणारे धर्म विचार तुम्ही आत्मसात करा. तुम्ही विद्वानांपेक्षा श्रेष्ठ आहात. अशा तरुणाईला प्रेरणा देणाऱ्या विचारांची पेरणी करुन विवेकानंदांनी तरुण भारत घडविला. ते सांगतात ''भावनाशील हृदय, विचारशील बुद्धी आणि कार्यशील हात देशाची आणि मानवतेची शक्ती आहे.'' संपूर्ण भारत भ्रमण करीत विवेकानंदांनी तरुणांमधील आत्मशक्तीचा स्फुलिंग फुलविला. रविंद्रनाथ टागोरांनी म्हटल्याप्रमाणे,''तुम्हाला जर भारताचा अभ्यास करायचा असेल तर विवेकानंदांचा अभ्यास करा.'' खरोखर विवेकानंदांच्या विचारात भारतीय संस्कृतीचे दर्शन घडतेच शिवाय उद्याचा शक्तीमान भारतही दिसतो. स्वामी विवेकानंदांच्या कृती विचारात भारतीयत्व होते. ते म्हणतात, ''मी भारतवासी आहे प्रत्येक भारतीय माझा भाऊ आहे भारतीयत्व हेच माझे जीवन आणि हिंदुस्थानचे सद्भाग्य हेच माझे सद्भाग्य आहे.'' बंधुत्वातून भारतीयत्व जोपासणाऱ्या विवेकानंदांचा अंतिम भाव विश्वबंधुत्वाचा होता. १५ सप्टेंबर १८९३ मध्ये शिकागो येथील

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-3, Issue-9, Oct-2013 Available online at www.aygrt.isrj.net

भाषणाचा शुभारंभ त्यांनी 'बंधु भगिनिंनो' या वाक्याने केला होता. ही विश्वबंधुत्वाची हाक त्यांना जगासमोर मांडण्याची संधी मुळात अनागरिक धम्मपाल या बौद्ध भिक्खूने आपल्याला वेळ देवून दिली होती. विवेकानंदांच्या मनात बुद्ध होता त्यांनी अनेक धर्मांचा अभ्यास केला. बायबल,वेद कुराण, बुद्धपिटकातील विचार त्यांनी आत्मसात केले. ते म्हणतात ''या सर्व धर्मांचा मी स्वीकार करतो.'' ते स्पष्टपणे सांगतात 'मी मशिदीत नमाजला जाईन,चर्चमध्ये गुडघे टेकवून प्रार्थना करेन, मी बुद्धाला शरण जाईन आणि साधू सोबत ध्यान करेन.' यावरुन त्यांना मानवता हाच धर्म अपेक्षित होता.

आपल्या देशात आजही स्त्री-भ्रूणहत्या, हुंडा,बलात्कार स्त्री पुरुष विषमता पराकोटीची आहेत. स्त्रीला सन्मानाचे जीवन मिळाले पाहिजे म्हणून स्त्री उध्दाराबाबत विवेकानंदांनी प्रेरणादायी विचार मांडले आहेत. मुलाला महान,शक्तीमान बनविणारी महाशक्ती प्रत्येक आई आहे. स्त्रियांच्या उद्धारात मानवाचे आणि देशाचे कल्याण आहे. स्त्रियांना योग्य सन्मान देणारे देशच उन्नत आहे. स्त्रियांचा ज्या देशात सन्मान होत नाही तो देश कधीही उन्नत होत नाही. नीतीमध्ये

जीवनाचे साफल्य साठविले असून पावित्र्य गमावून स्त्रीने काहीही संपादन करणे योग्य नाही. भारतीय संस्कृतीत स्त्रीचे महत्व 'माता' या भूमिकेत सामावले असून पाश्चात्य संस्कृतीत 'पत्नी' च्या भूमिकेत असल्याचे स्पष्ट करतात. स्त्री पुरुष भेद न करता समान संधीचा त्यांनी पुरस्कार केला होता.

विवेकानंदाच्या वाङ्मयातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. उद्याच्या उज्वल भारतासाठी प्रत्येक पिढीला प्रेरणा देणारा विचार स्त्रोत त्यांच्या कृती विचारात आहे. ज्या तरुणांमध्ये देशाचे भवितव्य सामावले आहे त्या तरुणांना ध्येयवादी बनविणारे विचार प्रखर राष्ट्रभक्तीचा प्रत्यय देतात. मनाची एकाग्रता आणि सुदृढ इच्छाशक्ती द्वारे आत्मिक शक्ती देणारे विवेकानंदाचे सर्व विचार मानवी कल्याणाचे ऊर्जास्त्रोत आहे.

निष्कर्ष -

१) विवेकानंदानी आत्मिक शक्तीतून मानवाचे कल्याण साधणाऱ्या भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले आहे.

२) विवेकानंद तरुणमनात घडविणारे तरुणांचे ऊर्जा स्त्रोत ठरतात.

३) विवेकानंदाच्या विचारात शिक्षणाचा खरा अर्थ इच्छाशक्ती प्रबळ करून मानवी जीवनाचा विकास साधणे आहे.

४) राष्ट्रनिर्माणात विवेकानंदाच्या विचाराचे महत्वपूर्ण स्थान आहे.

५) भारतीय स्त्रीचे महत्व 'माते' च्या भूमिकेत असून स्त्री उद्धारात देशाची उन्नती साधता येते.

संदर्भ ग्रंथ -

१) तरुणांना आवाहन,स्वामी विवेकानंद,रामकृष्णमठ धंतोली नागपूर.

२) स्वामी विवेकानंद,ग्रंथावली खंड ७,श्री रामकृष्ण आश्रम धंतोली नागपूर २००९.

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-3, Issue-9, Oct-2013
Available online at www.aygrt.isrj.net

७) राष्ट्राला आवाहन, रामकृष्णमठ, धंतोली,नागपूर प.आ.२००८